# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नासिक

## शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद (School Council)

बैठक 50, दिनांक 28.08.2018

## इतिवृत्त

शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद बैठक क्र. 50 , दि. 28.08.2018 रोजी सकाळी 11.30 ते 5.00 या वेळेत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील यश-ईन इमारत- येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस पुढील सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1. डॉ. कविता साळुंके — | अध्यक्ष, प्र.संचालक,शिक्षणशास्त्र विद्याशाखा |
| 2. डॉ. संजिवनी महाले — | सदस्य व सचिव, शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद |
| 3. प्रा.डॉ. एस.व्ही. चौधरी — | सदस्य, इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिव्हर्सिटी , न्यु दिल्ली |
| 4. डॉ. आर.बी. मानेकर-- | सदस्य, प्राचार्य,शिक्षणशास्त्र महाविद्यालय, अकोला |
| 5. प्रा. डॉ. जयदिप निकम -- | सदस्य, प्र.संचालक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा |
| 6. प्रा. माधव पळशीकर -- | सदस्य, सह.प्राध्यापक, संगणकशास्त्र विद्याशाखा |
| 7. डॉ.विजया पाटील- | स.प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, |
| 8. प्रा. विजयकुमार पाईकराव | सदस्य, स.प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, |
| 9. डॉ. डी.डी. पवार | सदस्य, स.प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, |
| 10. डॉ. सुभाष सोनूने — | सदस्य, स.प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, |
| 11. सौ. शर्मिष्ठा ओक | निमंत्रित सदस्य, शिक्षणशास्त्र विद्याशाखा |
| 12. श्री. शिवानंद कहाळेकर— | निमंत्रित सदस्य, प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, |
| 13. श्री. ज्ञानेश्वर जाधव — | निमंत्रित सदस्य, प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, |
| 14. डॉ.प्रकाश देशमुख — | निमंत्रित सदस्य, विद्यार्थी सेवा विभाग |
| 15. सौ.साधना लामतूरे — | निमंत्रित सदस्य, शिक्षणशास्त्र विद्याशाखा |

बैठकीस खालील पाच सदस्य त्यांच्या वैयक्तीक अडचणींमुळे उपस्थित राहू शकले नाही.

- डॉ. अरुण जवळेकर -- सदस्य, प्राचार्य, चेंबुर बी.एड. कॉलेज, चेंबूर, मुंबई
- डॉ. चंद्रकांत बोरसे — सदस्य, प्राचार्य, म.वि.प्र.चे बी.एड. कॉलेज, नाशिक
- प्रा. प्रा.डॉ. उर्मिला धूत -- सदस्य, प्राचार्य,शिक्षणशास्त्र महाविद्यालय, परभणी
- डॉ. हेमंत राजगुरु — सदस्य, सहा.प्राध्यापक, शैक्षणिक सेवा विभाग
- प्रा. डॉ. सुरेश पाटील -- सदस्य, सहा.प्राध्यापक, मूल्यमापन विभाग

50.2. **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2018/ 02-**

दि. 20.02.2018 रोजी झालेल्या 49 व्या शिक्षणशास्त्र परिषद बैठकीचे इतिवृत्त आणि कार्यवृत्तास मान्यता देण्यात आली. ( सहपत्र क्र. 1 व 2)

50.3. शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील सर्व शिक्षणक्रमांच्या प्राश्निक, परीक्षक, समीक्षक, यांचे नावांना मान्यता देण्यात येऊन विद्वत्त परिषदेकडे मान्यतेसाठी पाठविण्यास शिफारस करण्यात आली. (सहपत्र क्र. ३)

50.4 **चर्चेचे विषय-**

50.4.1 **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2018/ 03**

**एम.ए. (शिक्षणशास्त्र) च्या प्रत्येक सत्रातील परीक्षेबाबत...**

**टिपण्णी :** एम.ए. (शिक्षणशास्त्र ) या शिक्षणक्रमात सत्र पध्दतीने परीक्षा घेतली जाते. सद्यस्थितीत पहिल्या सत्राची व तिसऱ्या सत्राची परीक्षा आणि दुसऱ्या व चौथ्या सत्राची परीक्षा एकाच वेळी घेण्यात येते. त्यामुळे विद्यार्थ्यांना एखाद्या सत्रात अनुत्तीर्ण झाल्यास पुढे वर्षभर थांबावे लागते व त्यामुळे संपूर्ण वर्ष वाया जाते. प्रत्येक सत्रात परीक्षा घेण्यासंदर्भात मा. कुलगुरु यांनी मान्यता दिलेली आहे. त्यामुळे सत्रनिहाय परीक्षा आयोजित करताना प्रत्येक सत्राच्या परीक्षा वेगवेगळ्या तारखांना आयोजित करण्यात याव्यात. सदर विषय चर्चा व मान्यतेस सादर झाला.

**निर्णय :** सर्व सत्राच्या परीक्षा प्रत्येक सत्राच्या वेळी स्वतंत्र तारखांना आयोजित करण्यास मान्यता देऊन सदर विषय विद्वत्त परिषदेमध्ये मान्यतेसाठी ठेवण्याची शिफारस करण्यात आली.

50.4.2 **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2018/ 04**

**एम.ए. (शिक्षणशास्त्र) Choice Based Credit System (CBCS) साठी संवादकौशल्ये (MAR 549) ह्या अभ्यासक्रमाचा समावेश करणेबाबत...**

**टिपण्णी :** एम.ए. (शिक्षणशास्त्र) Choice Based Credit System (CBCS) ह्या UGC च्या धोरणानूसार काही अभ्यासक्रम देण्यात आलेले आहेत. त्यामध्ये 'संवादकौशल्ये' (MAR-549) हा नविन अभ्यासक्रम समाविष्ट करण्यास सदर विषय चर्चा व मान्यता मिळणेसाठी सादर झाला.

**निर्णय:** या विषयावर चर्चा होऊन MAR 549 'संवाद कौशल्य' हा विषय ऑडिट कोर्स म्हणून एम.ए. (शिक्षणशास्त्र) मध्ये समाविष्ट करण्यास मान्यता देऊन सदर विषय विद्वत परिषदेपुढे मान्यतेसाठी ठेवण्याची शिफारस करण्यात आली.

50.4.3 **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2018/ 05-**

**बी.एड. शिक्षणक्रम नविन प्रवेश प्रक्रिया-**

**टिपण्णी :** बी.एड. शिक्षणक्रम 2018-20 पासून विकेंद्रित प्रवेश प्रक्रिया कार्यान्वित करण्यात येत आहे. ही विकेंद्रित प्रवेश प्रक्रिया आणि माहितीपुस्तिका मान्यतेसाठी सादर केली.

**निर्णय :** बी.एड. शिक्षणक्रम 2018-20 पासूनच्या विकेंद्रित प्रवेश प्रक्रिया आणि माहितीपुस्तिकेस मान्यता देऊन सदर विषय विद्वत परिषदेपुढे मान्यतेसाठी ठेवण्याची शिफारस करण्यात आली.

50.4.4 **विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2018/ 06-**

**बी.एड. शिक्षणक्रम पूर्नरचित शिक्षणक्रमाच्या लेखक व संपादक यादी मान्यतेसाठी सादर-**

**टिपण्णी :** बी.एड. शिक्षणक्रमाच्या सहा विषयांचे लेखन कार्य पूर्ण झाले असून त्यासंबधीत विषयनिहाय लेखक संपादक याद्या मान्यतेसाठी सादर केल्या.

**निर्णय :** बी.एड. शिक्षणक्रमाच्या सहा विषयांचे लेखन कार्य पूर्ण केलेल्या लेखक संपादकांना मान्यता देऊन सदर विषय विद्वत परिषदेपुढे मान्यतेसाठी ठेवण्याची शिफारस करण्यात आली.

50.4.5 **विषय क्र. बी.**-1 / **एफ**-175 / 2018/ 07-

**शालेय व्यवस्थापन पदविका (शा.व्य.प.) शिक्षणक्रम मानधन तक्त्याबाबत..**

**टिपण्णी :** शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाची अभ्यासकेंद्रावरील अध्ययनार्थी प्रवेशाची क्षमता प्रती तुकडी 60 इतकी आहे. त्यामुळे अभ्यासकेंद्रावरील मानधन वितरण तक्ता 60 अध्ययनार्थी आहेत असे गृहीत धरुन तयार केले आहे. परंतु गेल्या दोन –तीन वर्षापासून अभ्यासकेंद्रावर पूर्ण संख्येने प्रवेश होत नसल्याने मान्य दराने मानधन देताना अभ्यासकेंद्राची अडचण होताना दिसते. परिणामत: अभ्यासकेंद्रावरील कार्य मानधन तक्ता प्रति विद्यार्थी तयार करण्यात आला आहे. चर्चा व मान्यतेसाठी सादर झाला.

**निर्णय :** शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या प्रति विद्यार्थी अभ्यासकेंद्र मानधन तक्त्यास मान्यता देऊन सदर विषय विद्वत परिषदेपुढे मान्यतेसाठी ठेवण्याची शिफारस करण्यात आली.

50.4.6 **विषय क्र. बी.**-1 / **एफ**-175 / 2018/ 08-

**शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम पाठ्यक्रम विकसन तज्ज्ञ मान्यतेबाबत..**

**टिपण्णी :** शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या पूनर्रचनेचे कार्य शिक्षणशास्त्र विद्याशाखेने हाती घेतलेले आहे. त्या संदर्भात तज्ज्ञ सल्लागार समितीच्या नावांना मागील विद्याशाखा परिषदेने मान्यता दिलेली आहे. सोबत या शिक्षणक्रमाच्या पाठ्यक्रम विकसन समितीच्या नावांबाबत चर्चा व मान्यतेसाठी सादर करण्यात आला.

**निर्णय :** श्रीमती वांगीकर, श्रीमती निता पाटील तसेच ज्यांना प्रशासनाचा अनुभव आहे असे निवृत्त मुख्याध्यापक किंवा शाळेतील वरीष्ठ शिक्षकांचा समावेश शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या पाठ्यक्रम विकसन समितीत करण्याच्या सूचनेसह परिशिष्ट क्र.8 मधील पाठ्यक्रम विकसन तज्ज्ञ यादीस मान्यता देण्यात आली. आणि सदर विषय विद्वत परिषदेपुढे मान्यतेसाठी ठेवण्याची शिफारस करण्यात आली.

50.4.7 **विषय क्र. बी.**-1 / **एफ**-175 / 2018/ 09-

**शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या मूल्यमापन योजनेतील बदलाबाबत-**

**टिपण्णी :** शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या मूल्यमापन योजनेतील कृती संशोधन घटकाचे अंतर्गत आणि बहिस्थ परीक्षकांकडून देण्यात येणारे प्रत्येकी 50 गुणांचे प्रबंध मूल्यमापन व मौखिक परीक्षा असे विभाजन न केल्याने केवळ प्रबंध मूल्यमापन गुणांमुळे विद्यार्थी पास होतात. या शिक्षणक्रमात संयुक्त मौखिक परीक्षा अपेक्षित असते ज्यात विद्यार्थ्यांच्या कृतीसंशोधन मूल्यमापनासोबत इतर कार्याचेही मूल्यमापन करता येते. नविन मूल्यमापन योजना चर्चा व मान्यतेसाठी सादर करण्यात आली.

**निर्णय :** शालेय व्यवस्थापन पदविका मूल्यमापन योजनेत अंतर्गत आणि बहिस्थ मूल्यमापन प्रत्येकी 40% गुणांनी उत्तीर्ण होणे अनिवार्य करण्यात यावे. कृतिसंशोधन अहवाल मूल्यमापन व मौखिक परीक्षा विभाजन अंतर्गत व बहिस्थ परीक्षक प्रत्येकी 25 गुण असे एकूण 50 गुण आणि कृतीसंशोधन अहवाल मूल्यमापन

मौखिक परीक्षा व अंतर्गत कार्य तपासणी यासाठी 50 गुण अशी 100 गुणांची विभागणी करण्यास मान्यता देण्यात आली. दोन्ही भाग मिळून विद्यार्थ्याला उत्तीर्णतेसाठी 40 गुण अनिवार्य करावे या सूचनेसह या विषयास मान्यता देण्यात आली आणि विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.

**50.4.8 विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2018/ 10-**

**शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्राबाबत..**

**टिपण्णी :** शालेय व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रमाची सन 2018 रोजी 141 अभ्यासकेंद्र आहे. त्यातील बऱ्याच अभ्यासकेंद्रावर अत्यंत कमी प्रवेश ( म्हणजे किमान सात पेक्षाही कमी प्रवेश ) होतात. अनेक जिल्ह्यात दोन पेक्षा जास्त केंद्रे आहेत, त्यामुळे सदरील परिस्थिती उद्भवते. अभ्यासकेंद्रावर मानधन खर्च व इतर अडचणी निर्माण होतात जिल्हा निहाय एकापेक्षा अधिक संख्येने असलेल्या अभ्यासकेंद्रामुळे त्यांच्यावरील गुणवत्ता नियंत्रण व प्रवेशाची कमतरता येते. प्रत्येक जिल्ह्याला एक याप्रमाणे सम व विषम संख्येचे वर्ष-निहाय अभ्यासकेंद्राचे दोन संच तयार करावेत अशी योजना मांडण्यात आली. संच तयार करताना प्रगल्भ अभ्यासकेंद्राना प्राधान्य देण्यात आले आहे. सदर विषय व अभ्यासकेंद्र संच चर्चा व मान्यतेसाठी सादर करण्यात आला.

**निर्णय :** ज्या अभ्यासकेंद्रावर मागील तीन वर्षात 20 पेक्षा कमी प्रवेश आहेत अशी केंद्र शक्यतो बंद करण्यात यावीत. आणि गुणवत्ता नियंत्रणासाठी प्रत्येक जिल्ह्याला दोन अभ्यासकेंद्र निश्चिती करुन सम व विषम तुकडी विचारात घेऊन एका जिल्ह्यात एक अभ्यासकेंद्र कार्यवाही करण्यासाठी तयार केलेल्या सहपत्र 10 मधील केंद्र यादीस मान्यता देण्यात आली. व सदर विषयाची विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.

**50.4.9 विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2018/ 11-**

**समावेशित शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम तज्ज्ञ सल्लागार समिती मान्यता-**

**टिप्पणी :** शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत समावेशित शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरु करण्यासाठी दिनांक 20.02.2018 रोजी झालेल्या विद्याशाखा परिषद बैठकीत मान्यता देण्यात आलेली होती. तज्ज्ञ सल्लागार समितीसाठी संपूर्ण महाराष्ट्रातील या विषयातील तज्ज्ञांची निवड करण्यात आलेली आहे. सदर विषय मान्यतेसाठी सादर..

**निर्णय :** शिक्षणशास्त्र विद्याशाखेचे संचालक आणि संबधित शिक्षणक्रमाचे समन्वयक हे तज्ज्ञ सल्लागार समितीचे सदस्य असतील, या सूचनेसह समावेशित शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम सहपत्र 11 मध्ये देण्यात आलेल्या तज्ज्ञ सल्लागार समितीस मान्यता देण्यात आली.

**50.4.10 विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2018/ 12-**

**स्वयंसहाय्य गट प्रेरक/ प्रेरिका प्रमाणपत्र शिक्षणक्रम- पूर्नरचित अभ्यासक्रम मान्यते बाबत..**

**टिप्पणी :** शिक्षणशास्त्र विद्याशाखेने सन 2000 साली स्वयं-सहाय्य गट प्रेरक / प्रेरिका शिक्षणक्रम विकसित करुन तो कार्यान्वित केला. स्वयंसहाय्य गट चळवळ जगमान्य असून त्यात अलीकडे अनेक बदल झालेले दिसतात. शासकीय आणि अशासकीय पातळीवर त्यासंदर्भात अनेक उपक्रम राबविले जात आहेत. त्यामुळे सद्य परिस्थितीनुसार पूर्वी विकसित केलेल्या, शिक्षणक्रमात त्या अनुषंगाने बदल करणे आवश्यक वाटते. दि. 20.02.2018 रोजी झालेल्या शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषदेच्या बैठकीत तज्ज्ञ सल्लागार समितीस मान्यता

देण्यात आलेली होती. तज्ज्ञ सल्लागार समितीची बैठक दिनांक 31.07.2018 रोजी घेण्यात आली . या समितीने दोन प्रकारच्या प्रमाणपत्र शिक्षणक्रम संरचनेस मान्यता दिलेली आहे. सदर दोन्ही प्रमाणपत्र शिक्षणक्रमांची संरचना चर्चा व मान्यतेसाठी सादर....

1. **स्वयंसहाय्य गट प्रेरक / प्रेरिका मूलभूत प्रमाणपत्र शिक्षणक्रम**
2. **स्वयंसहाय्य गट प्रेरक / प्रेरिका प्रगत प्रमाणपत्र शिक्षणक्रम**

**निर्णय :** स्वयंसहाय्य गट प्रेरक/ प्रेरिका प्रमाणपत्र शिक्षणक्रम पूर्नरचित अभ्यासक्रमास मान्यता देण्यात आली. जे विद्यार्थी मूलभूत आणि प्रगत असे दोन्ही शिक्षणक्रम पूर्ण करतील त्यांना जादा प्रात्यक्षिक कार्य देऊन पदविका देण्याचेही सूचित करण्यात आले. या विषयास मान्यता देऊन सदर विषय विद्वत परिषदेकडे मान्यतेसाठी पाठवावा अशी शिफारस करण्यात आली.

**50.4.11 विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2018/ 13-**

**घरकामगार कौशल्य पाठ्यपुस्तक लेखक संपादक कार्योत्तर मान्यतेबाबत..**

**टिप्पणी :** घरकामगार कौशल्य पाठ्यपुस्तक लेखनासाठी खालील लेखकांना कार्योत्तर मान्यतेसाठी प्रस्ताव ठेवण्यात आला. श्री. मिलिंद बाबर श्रीमती. सुजाता बाबर प्रा. विजयकुमार पाईकराव डॉ. कविता साळुंके. इ.

**निर्णय :** उपरोक्त टिप्पणीत दिलेल्या घरकामगार कौशल्य पाठ्यपुस्तक लेखनकार्य केलेल्या लेखक संपादकांच्या नावांना मान्यता देण्यात आली. आणि सदर विषय विद्वत परिषदेकडे मान्यतेसाठी पाठवावा अशी शिफारस करण्यात आली.

**50.4.12 विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2018/ 14-**

**एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाचे संशोधन अहवालाच्या कॉपीबाबत..**

**टिप्पणी :** एम. ए. शिक्षणशास्त्रामध्ये विद्यार्थी अभ्यासकेंद्रावर संशोधन अहवाल सादर करतात. अभ्यासकेंद्रावर अंतर्गत आणि बहिस्थ परीक्षकांमार्फत संशोधन अहवालांचे मूल्यमापन आणि मौखिक परीक्षा घेण्यात येते. त्यानंतर अभ्यासकेंद्रामार्फत संशोधन अहवाल एक प्रत आणि गुण विद्यापीठाकडे पाठविण्यात येतात. सर्व अभ्यासकेंद्रावरील गुणदानात अंतर्गत आणि बहिस्थ परिक्षकांच्या गुणदानात १५ गुणापेक्षा अधिक फरक असलेल्या संशोधन अहवालांचे परिशीलन केले जाते. अभ्यासकेंद्रावरून सादर झालेल्या संशोधन अहवालात कॉपी असलेले अहवाल आढळल्यास त्यावर करावयाच्या कार्यवाही बाबत मार्गदर्शनासाठी सादर.

**निर्णय :** एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमाच्या दोन विद्यार्थ्यांनी समान आशयाचे संशोधन अहवाल सादर केलेले आहे ही कॉपीकेस असल्यामुळे याबाबतचा निर्णय घेण्यासाठी सदर विषय परीक्षा मंडळाकडे पाठविण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला.

**50.4.13 विषय क्र. बी.-1 / एफ-175 / 2018/ 15-**

**स्वयंसहाय्य गट प्रेरक/ प्रेरिका प्रमाणपत्र शिक्षणक्रम- पूर्नरचित अभ्यासक्रम लेखक संपादक मान्यतेबाबत..**

**टिप्पणी :** पूर्नरचित स्वयंसहाय्य गट प्रेरक/ प्रेरिका प्रमाणपत्र शिक्षणक्रम- मूलभूत आणि प्रगत शिक्षणक्रमाच्या अभ्यासक्रम निहाय लेखक संपादकांची यादी मान्यतेसाठी सादर.

**निर्णय :**स्वयंसहाय्य गट प्रेरक / प्रेरिका शिक्षणक्रमासाठी लेखक संपादक यादीमध्ये श्री. विकास कुलकर्णी, लातूर श्रीमती. झिया खान मौला अली सय्यद, श्रीमती मीना गोखले, ही नावे समाविष्ट करावीत. या व्यतिरिक्त या क्षेत्रातील तज्ज्ञांनी सांगितलेल्या नावांना मा. संचालक. शिक्षणशास्त्र विद्याशाखा यांनी परिषदेच्या वतीने मान्यता द्यावी असे सुचित करुन या विषयास मान्यता देण्यात आली. आणि सदर विषयाची विद्वत परिषदेच्या मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली.

50.5. **ऐनवेळेचे विषय**

50.5.1 **विषय क्र. बी.**-1 / **एफ**-175 / 2018/ 16-

**स्वयंसहाय्य प्रेरक/प्रेरिका प्रमाणपत्र शिक्षणक्रम अभ्यासकेंद्र मानधन वितरण योजना मान्यतेबाबत..**

**टिप्पणी :** स्वयंसहाय्य प्रेरक/प्रेरिका प्रमाणपत्र शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्रावर किमान 20 अध्ययनार्थी आणि कमाल 60 अध्ययनार्थींचे प्रवेश अपेक्षित आहेत. प्रत्येक अध्ययनार्थीमागे रु. 500/- अभ्यासकेंद्राला प्राप्त होणार आहे. वीस अध्ययनार्थींचे प्रवेश होतील असे गृहीत धरुन मानधन वितरण तक्ता विकसित केलेला आहे. वीस पेक्षा जास्त / कमी अध्ययनार्थी असल्यास त्या प्रमाणात मानधन वितरण करण्यात यावे. विषय मान्यतेसाठी सादर-

**निर्णय :** स्वयंसहाय्य प्रेरक/प्रेरिका प्रमाणपत्र शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्रासाठी प्रती विद्यार्थी तयार केलेल्या मानधन वितरण तक्त्यास मान्यता देण्यात येऊन विद्वत परिषदेकडे मान्यतेसाठी पाठवावे अशी शिफारस करण्यात आली.

50.5.2 **विषय क्र. बी.**-1 / **एफ**-175 / 2018/ 17-

**बालसंगोपन आणि रंजन शिक्षण प्रमाणपत्र शिक्षणक्रम पूर्नरचना मान्यतेबाबत..**

**टिप्पणी :** शिक्षणशास्त्र विद्याशाखेतील सुरु असलेल्या बालसंगोपन आणि रंजन शिक्षण शिक्षणक्रमाचे पूर्नरचनेचे कार्य सुरु आहे. सहपत्र 10.9 प्रमाणे तज्ज्ञ सल्लागार समितीस शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद 49 मध्ये मान्यतेबाबत 20 फेब्रुवारी 2018 मध्ये विषय उपक्रमांक 49.3.20 विषय क्र.बी.-1/ एफ-175/2018/21 प्रमाणे ठेवण्यात आला होता. परंतू काही सदस्य स्वर्गवासी झाल्याने तसेच काही वार्धक्यामुळे येऊ शकत नाही असे कळते. म्हणून सदर नावे वगळून नविन यादी तयार करण्यात आली आहे सदर यादी कार्योत्तर मान्यतेसाठी सादर...

**निर्णय :** बालसंगोपन आणि रंजन शिक्षण शिक्षणक्रमाचे पूर्नरचनेचे साठी तयार केलेल्या तज्ज्ञ सल्लागार समिती च्या तज्ज्ञ सल्लागार समिती यादीस मान्यता देण्यात येऊन विद्वत्त परिषदेकडे मान्यतेसाठी पाठवावे अशी शिफारस करण्यात आली.

50.5.3 **विषय क्र. बी.**-1 / **एफ**-175 / 2018/ 18-

**टिप्पणी :**डॉ. प्रकाश देशमुख, विद्यार्थी सेवा विभाग यांनी शालेय स्तरावर कार्य करणाऱ्या लिपिक / क्लार्क यांच्यासाठी शालेय आर्थिक व्यवस्थापन प्रमाणपत्र शिक्षणक्रम वाणिज्य व्यवस्थापन विद्याशाखेचे संचालक पदी कार्यरत असताना विकसित केला आहे. असा शिक्षणशास्त्र विद्याशाखेमार्फत कार्यान्वित करावा यासंदर्भात सदर विषयाची मांडणी केली.

**निर्णय** : सदर शिक्षणक्रम शाळेतील कार्यालयीन स्टाफसाठी असल्याने या शिक्षणक्रमाचे नाव " शालेय आस्थापना व्यवस्थापन प्रमाणपत्र शिक्षणक्रम " असे करण्यात यावे, असे सूचित करण्यात आले. शिक्षणशास्त्र विद्याशाखा शिक्षक प्रेरक,मार्गदर्शक, समुपदेशक अशांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम कार्यान्वित होणे अपेक्षित असल्याने सदर शिक्षणक्रम विद्याशाखेमार्फत कार्यान्वित न करता इतर योग्य विद्याशाखेकडे देण्यात यावा असा निर्णय घेण्यात आला.

50.5.4 **विषय क्र. बी.**-1 / **एफ**-175 / 2018/ 19-

प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या सर्व पुस्तकांमध्ये तज्ज्ञ सल्लागार समितीबरोबरच शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद सदस्यांची नावे घ्यावीत असा विषय मांडला त्यास सर्वानूमते मान्यता देण्यात आली.

शेवटी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर करण्यात आहे.

(डॉ. संजीवनी महाले)
सचिव
शिक्षणशास्त्र विद्याशाखा परिषद

(डॉ. कविता साळूंके)
प्र.संचालक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा

Y.C.M.O.U., Nashik * ...of Education